# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

१) शैक्षणिक वर्ष २०१८–१९ खेळाडूची वयोमर्यादा अखिल भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांच्या पात्रता नियमानुसार वयोमर्यादा २५ अशी असेल.

२) शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करीता खेळाडूची जन्मतारीख सर्व क्रीडाप्रकारांकरीता ०१ जुलै, १९९३ नंतरची ग्राह्य धरण्यात येईल.

३) जन्मतारखेचा दाखला हा खेळाडूची जन्मतारीख प्रमाणित करण्याकरीता फक्त **दहावी पासींग** प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या **प्राचार्य** अथवा **उपप्राचार्य** यांनी ॲटेस्टेड केलेले असावे.

४) खेळाडू १२वी केव्हा पास झाला याची खातरजमा करण्याकरीता **१२वी उत्तीर्ण** झाल्याचे **गुणपत्रक** आवश्यक असेल संबंधित महाविद्यालयाच्या **प्राचार्य** अथवा **उपप्राचार्य** यांनी ॲटेस्टेड केलेले असावे. तसेच खेळाडू **पदव्युत्तर वर्गात** शिकत असल्यास **पदवी उत्तीर्ण** झाल्याचे अटेस्टेड गुणपत्रकसुध्दा आवश्यक राहील.

५) संपूर्ण पात्रता प्रमाणपत्र फॉर्म हे **खेळाडूच्या स्वहस्ताक्षरामध्येच** असावे.

६) संबंधित खेळाडूने पूर्ण नाव (मराठी व इंग्रजी), घरचा पत्ता, भ्रमणदुरध्वनी व घरचा दुरध्वनी नंबर उल्लेख करणे क्रमप्राप्त राहील.

७) खेळाडूची जन्मतारीख स्पष्ट दिसेल अशा पध्दतीने लिखित असावी.

८) पात्रता प्रमाणपत्रावर संबंधित खेळाडू शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचा प्रिंटेड गोल/चौकोनी पिनकोडसह शिक्का असणे आवश्यक असेल.

९) पात्रता प्रमाणपत्र हे संबंधित महाविद्यालयाचे असावे. दुसऱ्या महाविद्यालयाचे नाव खोडून शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे हस्ताक्षरामध्ये महाविद्यालयाचे नाव लिहिलेले पात्रता प्रमाणपत्र ग्राह्य धरता येणार नाही.

१०) चारही विभागाच्या सचिवांनी त्या–त्या खेळाकरिता देण्यात येणाऱ्या टी–शर्ट/कॉलर टी–शर्ट/सॅन्डो बनियन देताना सदर टी–शर्ट, सॅन्डो बनियन किंवा कॉलर टी–शर्टवरती निवड समितीच्या नजरेस येईल असा चेस्ट नंबर मागे व पुढे छपाई करण्यात यावी. **(टेबलटेनिस, बॅडमिंटन, पिस्तोल व रायफल शूटिंग, तलवारबाजी, रोईंग, कनोयिंग, आर्चरी हे क्रीडाप्रकार वगळून)**

११) आंतर विभागीय स्पर्धेठिकाणी संघ पाठविताना आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धेकरिता जी निवड समिती नियुक्ती केली असेल त्या निवड समितीच्या मुळ स्वाक्षरी असलेली निवडयादी आंतर विभागीय स्पर्धेठिकाणी ग्राह्य धरली जाईल त्याचप्रमाणे सदर यादीवर सन्माननीय विभागीय सचिवाची विभागीय शिक्यासह स्वाक्षरी आवश्यक असेल.

Scanned by CamScanner

१२) आंतर विभागीय स्पर्धेस सहभागी होताना प्रत्येक विभागीय खेळाडूने त्यांच्या संबंधित खेळाडू ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे प्राचार्य/उपप्राचार्य यांच्या स्वाक्षरीचे ओळखपत्र संबंधित शैक्षणिक वर्षाचे ग्राह्य धरण्यात येईल. **कोणत्याही महाविद्यालयाच्या लेटर पॅडवर संबंधित खेळाडूचा फोटो चिकटविलेले ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.**

१३) आंतर विभागीय स्पर्धेकरीता खेळाडूचे ओळखपत्र महाविद्यालयाकडून प्राप्त झाले नसल्यास तात्पुरत्या स्वरूपातील शैक्षणिक वर्ष नमूद केलेले ओळखपत्र संगणकावर तयार करण्यात येवून त्यास लॅमिनेशन करावे तसेच सदर ओळखपत्रावर प्राचार्यांची/उपप्राचार्यांची मुळ स्वाक्षरी व शिक्का असणे क्रमप्राप्त राहील व ते ओळखपत्र (प्रथम सत्राकरीता फक्त) ग्राह्य धरले जाईल.

१४) विभागीय कक्षेमध्ये समाविष्ठ होणाऱ्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांच्याकडून प्रति विद्यार्थी संख्येनुसार जमा होणारा प्रोरेटा निधी पहिला हप्ता म्हणून १५ सप्टेंबर ही तारीख कळविण्यात यावी तसेच दुसरा व अंतिम हप्ता १५ ऑक्टोबर अखेर जमा करण्यासाठी पत्रव्यवहाराने विभागातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाना कळविण्यात यावे व प्रोरेटा निधी कशाप्रकारे जास्तीत जास्त जमा करता यईल याकरीता सचिवांनी सातत्याने पत्ररूपाने व प्रत्यक्ष महाविद्यालये व संस्थेस भेटी देवून पाठपुरावा करण्यात यावा.

१५) शैक्षणिक वर्ष २०१७–२०१८ या वर्षामध्ये सांघिक क्रीडा स्पर्धेत **प्रथम, द्वितीय, तृतीय** व **चतुर्थ** क्रमांक प्राप्त केलेल्या महाविद्यालयाची भाग्यचक्रामध्ये योग्य त्या ठिकाणी नावे टाकून शैक्षणिक वर्ष २०१८–१९ ची प्रत्येक सांघिक खेळाची भाग्यचक्र संघ व्यवस्थापकांसमोर टाकण्यात यावी.

१६) सन्माननीय विभागीय सचिवांनी आपल्या विभागात जर आंतर विभागीय स्पर्धा असेल त्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहणे क्रमप्राप्त व बंधनकारक राहील.

१७) ज्या ज्या क्रीडाप्रकारामध्ये खेळाडू संख्या नियमानुसार असते तेवढयाच खेळाडूंचा संघ आंतर विभागीय स्पर्धास्थळी संबंधित विभागीय सचिवांनी त्या संघाच्या संघव्यवस्थापकांसमावेत पाठवावा. नियमानुसार क्रीडाप्रकारामध्ये आवश्यक असलेल्या खेळाडूंचीच निवासव्यवस्था आंतर विभागीय स्पर्धास्थळी करण्यात येईल.

१८) **आंतर विभागीय स्पर्धेस्थळी संयोजकाने स्पर्धकांची निवास व्यवस्था ज्या ठिकाणी केली असेल त्याच ठिकाणी स्पर्धक निवासी राहतील अन्यथा संबंधित संघास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.**

१९) आंतर विभागीय स्पर्धास्थळी प्रत्येक विभागीय संघासमावेत एक संघव्यवस्थापक व एक मार्गदर्शक यांची निवासव्यवस्था करण्यात येईल. (मैदानी स्पर्धा वगळता)

२०) विभागाच्या संघासाठी निवड झालेल्या सर्व खेळाडूंच्या बँक खाते पासबुकची झेरॉक्स प्रत विभागीय स्पर्धेच्यावेळी पात्रताप्रमाणपत्र फॉर्म सोबत जोडण्यात यावी.

२१) अखिल भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांचेकडून पात्रता निकषाबाबत जे बदल सुचविण्यात येतील ते पात्रता निकष बंधनकारक राहतील.

Scanned by CamScanner

२२) एखाद्या खेळाडूने महाविद्यालय बदलले असल्यास स्थानांतर दाखला (Transfer Certificate) जोडणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठ बदलले असल्यास स्थलांतर दाखला (Migration Certificate) जोडणे आवश्यक आहे.

सचिव,
विभागीय स्थानिक क्रीडा समिती

**संचालक**
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे-४११ ००७.

Scanned by CamScanner